महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA

===========================================================================

जावक क्रमांक – ५७/३२६३४८२ दिनांक :- ०९ जून, २०२६

**प्रसिद्धिपत्रक**

## म्हाडामध्ये १८ वा लोकशाही दिन संपन्न

मुंबई, दि. ९ जून, २०२६ : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) आज १८ वा लोकशाही दिन संपन्न झाला. मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर आणि मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात झालेल्या लोकशाही दिनात चार प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली.

माझगाव विभागातील सांघवी भवन मधील इमारत क्रमांक ६९-७३ मधील श्री संजय कुंदनलाल दोशी यांनी त्यांच्या इमारतीच्या पुनर्विकासानंतर विकासकाकडून दोन सदनिकांचा ताबा न मिळाल्याबाबत तक्रार दाखल केली होती. पुनर्विकास प्रकरणात भाडेकरूस सदनिका न मिळाल्याच्या तक्रारीची दखल घेत संबंधित विकासकाविरुद्ध एनओसी रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करून FIR दाखल करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश यावेळी श्री शंभरकर यांनी दिले. तसेच माहीम येथील १२८-१२९ धनश्री व देसाई या उपकरप्राप्त इमारतीतील दुकानी गाळा पात्रतेच्या प्रकरणात अर्जदाराने सादर केलेल्या अपुऱ्या कागदपत्रांच्या अभावी श्री रामशंकर श्यामलाल कनोजिया यांचा अर्ज नामंजूर करण्यात आला.

त्यानंतर श्री अली मोहम्मद शेख अब्दुल्ला यांच्या भायखळा येथील गवळी चाळीतील दोन सदनिकांच्या पात्रतेच्या प्रकरणात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री मिलिंद शंभरकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची सखोल फेरतपासणी करून, अहवाल वरिष्ठांच्या निर्णयासाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. यासेच चौथ्या सुनावणी दरम्यान श्री.शाम जगन्नाथ थिटे हे म्हाडाच्या छत्रपती संभाजीनगर मंडळाच्या सोडतीतील लाभार्थी असून, त्यांना चिखलठाणा गृहनिर्माण प्रकल्पातील संकेतांक क्र. १३९ मधील अल्प उत्पन्न गट (LIG) श्रेणीतील सदनिका प्राप्त झाली आहे. अर्जदाराने सदनिकेची संपूर्ण मूळ किंमत अदा केली आहे. परंतु, अर्जदाराने शेवटचे तीन हफ्ते भरण्यास विलंब केल्यामुळे मंडळाने नियमानुसार विलंब शुल्क आकारले. सदर विलंब शुल्क माफ करण्याबाबतच्या अर्जावर मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री मिलिंद बोरीकर यांनी विलंब शुल्क सवलतीच्या अर्जाबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करून प्रस्ताव वरिष्ठांच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

लोकशाही दिनाच्या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारींचे प्रभावी व वेळेत निराकरण करण्यासाठी म्हाडा कटिबद्ध असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

###

स्वाक्षरीत/-
(वैशाली गडपाले)
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra
East, Mumbai-400051. ☎022-55405066/77. Email :cpromhadaoffice@gmail.com

=====================================================

Outward No. : 57/3263482 Dt. 09 June, 2026

**Press Release**

# 18th Lokshahi Din Held at MHADA

**Mumbai, June 9, 2026:** The 18th Lokshahi Din (Democracy Day) was held today by the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA). Four cases were heard during the programme conducted at MHADA Headquarters, Bandra (East), under the chairmanship of Mumbai Board Chief Officer Mr. Milind Borikar and Mumbai Building Repairs and Reconstruction Board Chief Officer Mr. Milind Shambharkar.

A complaint was submitted by Mr. Sanjay Kundanlal Doshi, a resident of Building Nos. 69-73, Sanghvi Bhavan, Mazgaon Division, regarding non-receipt of possession of two rehabilitation flats from the developer after redevelopment of the building. Taking serious note of the complaint, Mr. Shambharkar directed the concerned officials to initiate the process of cancelling the No Objection Certificate (NOC) issued to the developer and submit a proposal for filing an FIR against the developer.

In another case related to the eligibility of a commercial shop premises in the cessed buildings Dhanashree and Desai (Building Nos. 128-129) at Mahim, the application of Mr. Ramshankar Shyamlal Kanojia was rejected due to insufficient supporting documents submitted by the applicant.

In the third case, concerning the eligibility of two residential units in Gawli Chawl, Byculla, claimed by Mr. Ali Mohammad Sheikh Abdullah, Mr. Milind Shambharkar directed the concerned officials to conduct a detailed re-examination of the documents submitted by the applicant and submit a report for consideration by the competent authority.

During the fourth hearing, Mr. Sham Jagannath Thite, a beneficiary of the MHADA Chhatrapati Sambhajinagar Board lottery, raised a grievance regarding waiver of late payment charges. Mr. Thite has been allotted a Low Income Group (LIG) dwelling unit under Code No. 139 in the Chikalthana Housing Project and has paid the entire cost of the flat. However, as the last three instalments were paid after the due dates, late payment charges were levied as per rules. Considering the applicant's request, Mr. Milind Borikar directed the concerned officials to examine the proposal sympathetically and submit it to the competent authority for approval.

It was reiterated during the Lokshahi Din that MHADA remains committed to ensuring timely and effective resolution of citizens' grievances through this public grievance redressal mechanism.

###

Sd/-
(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer / MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial


लोकशाही
दिन